# स्वरूपाशी संवाद : पसायदान

लेखक
प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे

प्रकाशक
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर
महाराष्ट्र, भारत
प्रकाशन मंच

**स्वरूपाशी संवाद : पसायदान (आशयनिष्ठ समीक्षा)**
Swarupashi Sanvad : Pasaydan (Criticism)

**लेखक**
**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे
मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक** : आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष– ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

**प्रथमावृत्ती** : २०२२

**टाईपसेटींग** :
श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर
मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक** : कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर

**मूल्य** ५०/–

विशेष निवेदन : 'आनंदोत्सव'प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.

ग्रंथनिर्मितीचा संपूर्ण खर्च सौ. उषा सहस्रबुद्धे यांनी केला असून, त्यातून मिळणारे उत्पन्न सेवाभावी ट्रस्टना देण्याचा संकल्प केला आहे.

या पुस्तकातील मतांशी प्रकाशन मंच सहमत असेलच असे नाही.



**माऊली ज्ञानेश्वरांच्या**
**सप्तशतकोत्तर संजीवन समाधीउत्सवानिमित्त**

## 'पैस' खांबास

# स्वरूपाशी संवाद : पसायदान

भगवान श्री संत माऊली ज्ञानेश्वरांनी, अमृतवाहिनी प्रवरा तीरावर वसलेल्या अतिपुरातन, निधीनिवासात अर्थात नेवासा गावात; आदिनाथ शिव अर्थात शंकराच्या मंदिरातील म्हणजे श्री करवीरेश्वर म्हणजेच कनैश्वर महादेवांच्या मंदिरातील खांबाला टेकून वाग्यज्ञ मांडला.

वाग्यज्ञाचे स्वरूप एका संपूर्ण ग्रंथावरील प्रवचन असे होते. हा ग्रंथ म्हणजे 'भगवद्गीता' हा ग्रंथ होय. हा ग्रंथ, भगवान वेदव्यासांनी, वेदोपनिषदांचे सार स्वरूपात, भगवान श्रीकृष्णांच्या मुखाने धनुर्धारी अर्जुनाला, कर्तव्यप्रवृत्त करण्यासाठी सांगितला.

सांगतांना, श्री अर्जुन निःशंक व्हावा यासाठी; श्री अर्जुनाने विचारलेल्या, सर्व प्रश्नांना समर्पक, थेट आणि तर्कशुद्ध, ज्ञानात्मक उत्तरे देत सांगितला. संभ्रमित अर्जुनाने स्पष्ट निर्वाळा देत सांगितले –

अर्जुन उवाच –

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान् भयाऽच्युत ।**
**स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनंतव ।।**

अ. १९ श्लो. ७३।। गीता

अर्थात, अर्जुन म्हणाला– हे अच्युता तुझ्या (कृपा) प्रसादामुळे माझा मोह नष्ट झाला. मला खऱ्या स्वरूपाचें दर्शन घडले. मी संशयरहित

झालो आहे. आता तुमची जी आज्ञा असेल ती मी पाळीन.

अर्जुनाप्रमाणेच, संभ्रमित होऊन, किंकर्तव्यविमूढ झालेल्या, समकालीन अवघ्या समाजाला; 'स्वरूप'दर्शन घडवून, 'स्वरूप' भावनेने कर्तव्यतत्पर करण्यासाठी; म्हणजे विश्वाच्या कल्याणाकरिता, कर्तव्यतत्पर करण्यासाठी; सद्गुरू माऊली निवृत्तिनाथांच्या कृपाज्ञे, भगवान श्री संत माऊली ज्ञानेश्वरांनी, हा वाग्यज्ञ मांडला. हा वाग्यज्ञ लोकभाषेत म्हणजे समकालीन मराठी बोलीभाषेत मांडला. माऊली म्हणतात –

**म्हणौनि व्यासाचा हा थोरू । विश्वासि जाला उपकारू ।**
**श्रीकृष्णउक्ती आकारू । ग्रंथाचा केला** ।।१७०७ अ.१८।।ज्ञा।।
**आणि तोचि हा मी आतां । व्यासाचीं पदें पाहतां पाहतां ।**
**आणिला श्रवणपथा । मऱ्हाठिया** ।१७०८ अ.१८ ।।ज्ञा।।

विश्वकल्याणाच्या भावनेने कर्तव्यतत्पर होणे; हाच स्वरूप-ज्ञान झालेल्या माणसाचा धर्म होय. या वाग्यज्ञाने, असे धर्मजागरण व्हावे; असा संकल्प सोडून; हा वाग्यज्ञ माऊलींनी सुरू केला. आता त्याची सांगता होत आहे. माऊली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात –

**किंबहुना तुमचें केलें । धर्मकीर्तन हें सिद्धी गेलें ।**
**येथ माझें जी उरलें । पाईकपण** ।।१७९२ अ.१८।।ज्ञा।।

अर्थात– किंबहुना, तुमच्या कृपाप्रसादाने, केलेले हे धर्मकीर्तन, अर्थात धर्मावरील यशपूर्ण व्याख्यान, शेवटाला गेले आहे. (धर्मकीर्तन संपूर्ण होणे) या वाग्यज्ञात माझे केवळ, सेवकपणच प्रदर्शित झाले आहे. म्हणजे मी केवळ निमित्तमात्र आहे. कारण हे धर्मज्ञान, अर्थात 'स्वरूप'ज्ञान, सर्वांठायीच प्रकटले आहे. ते माझ्या निमित्ताने होय.



म्हणूनच आता त्याच धर्मज्ञानाच्या योगाने; कर्तव्यतत्परतेने; यज्ञसांगतेची, परिणामस्वरूप फलप्राप्ती किंवा प्रसादप्राप्ती म्हणून; मी आपणा सर्वांकडे, अर्थात विश्वात्मक परमात्मास्वरूप, अशा सद्गुरूंकडे, अर्थात ठायीच्या स्वरूपाकडे प्रार्थना करीत आहे – माऊली ज्ञानेश्वर महाराज प्रार्थनेला, दान मागणीला सुरुवात करतात,

**आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।**
**तोषोनि मज द्यावें । पसायदान हें** ।।१७९३ अ.१८ ज्ञा।।

आता या वाग्यज्ञाने, म्हणजे भगवद्गीतेवर लोकभाषेत केलेल्या प्रवचनाने, विश्वात्मक देवाने संतुष्ट व्हावे. प्रसन्न होऊन; मला हे पसायदान अर्थात प्रसाद-दान द्यावे असे माऊली म्हणतात. येथे प्रसाद-दानाची याचना करणारे माऊली ज्ञानेश्वर आहेत, ज्याच्याकडे प्रसाद-दानाची याचना करताहेत, ते देव आहेत. विश्वात्मक अर्थात विश्वात व्यापलेला, दृश्य अस्तित्वात, म्हणजे अनंत अवकाशापासून अणुरेणुपर्यंतच्या; सर्व चराचर गोष्टींत, असलेला देव. हा देव म्हणजे नेमका कोणता देव?

भारतीय परंपरेत तेहतीस कोटी, म्हणजे तेहतीस प्रकारचे देव मानले आहेत. त्या सर्व देवांचे भारतीय परंपरेने अगणित अवतार स्वरूप देव मानले आहेत. त्या देवांत, पितृदैवते आणि मातृदैवते आहेत. अर्थात पुल्लिंगी आणि स्त्रिलिंगी दैवते आहेत. त्यांच्या मूर्ती आणि मंदिरेही अगणित आहेत. यातला कोणता देव विश्वात्मक देव आहे? की सगळेच देव विश्वात्मक देव आहेत? की या सर्व देवांची निर्मिती करणारा, कोणी त्या सर्वांपलिकडील देव आहे?

आम्ही लोक, प्रतीक स्वरूपात, आवडेल, भावेल, पावलाय किंवा पावतोय असे वाटेल; त्या कोणत्याही देवाची मनोभावे पूजा करतो. व्रते, अनुष्ठाने, होम, हवन, ग्रंथ पारायणे, भजन, कीर्तन, जप इ. काय काय करतो. कलियुगात नामभक्ती महत्त्वाची म्हणून नामस्मरण

करतो. माऊली ज्ञानेश्वरांनी ''हरिमुखे म्हणा'' एवढेच सांगितले आहे. तेच माऊली, विश्वात्मक देवाकडे याचना करतात. हे नेमके आहे तरी काय?

आमचे एवढे देव आहेत. एवढेच नव्हे, एकाच घरात राहणारे अनेक, वेगवेगळ्या देवाची भक्ती करतात; त्यावरून भांडणे झाली; तरी अगदीच तकलादु भांडणे होतात. याचे कारण जे आम्ही अशा अनेक देवतांना सगुण स्वरूपात भजतो, तेच आम्ही ''सर्व देव नमस्कारं केशवं प्रति गच्छती'' असे म्हणून भांडणे, आग्रह लगेच संपवतो. म्हणजेच तो केशव हाच सर्व देवस्वरूप आहे का? तो केशव म्हणजे भगवान शिव की भगवान श्रीकृष्ण; की आणखी कोणी? केव्हढा हा गोंधळ!

खरं पाहाता आपला तर अजिबातच गोंधळ होत नाही. याचे कारण भारतीय रक्तात, म्हणजे असलेपणात, तोच देव सर्वांठायी, म्हणजे, वर म्हटल्याप्रमाणे, विश्वात्मक आहे हे दृढ आहे! यामुळेच माऊलींनी, विश्वात्मक देवाकडे याचना केल्यावर कोणाच्याही मनात; संभ्रम र्मिाण झाला नाही.

प्रचलित काळात द्वैतभाव असलेल्या किंवा एकेश्वरवादी किंवा पोथीनिष्ठ किंवा तथाकथित बुद्धिप्रामाण्यवाद्यांना; हा वरवर दिसणारा, अनेक देवतांचा पसारा डोक्यात साशंकता निर्माण करतो. विश्वात्मक परमेश्वर ही कल्पना समजून घेणे अपरिहार्य आहे.

माऊली ज्ञानेश्वर महाराज विश्वात्मक देवाकडे याचना करतात. याचे कारण, त्यांनी मूळात, त्या विश्वात्मक देवापुढेच, त्याला प्रसन्न करण्यासाठीच, हा ज्ञानयज्ञ; ज्याचा उल्लेख माऊली वाग्यज्ञ असा करतात; तो मांडला आहे.

त्या विश्वात्मक देवाचा साक्षात्कार घडविणाऱ्या, सर्व पूजनीय साधनरूपांना वंदन तथा आवाहन करीत; अर्थात वाक्समिधा समर्पित करीत; वाग्यज्ञाचा आरंभ केला आहे. या विश्वात्मक देवाचा स्पष्ट उल्लेख; तसेच मानवी मनाने त्या देवाच्या आविष्काराचा अनुभव; ज्या



साधनरूपाने आला, त्याचाही उल्लेख वाक्रूपात केला आहे. हा उल्लेख माऊलींनी वाग्यज्ञ सुरू करतांना पहिल्याच ओवीत केला आहे. ती सर्वज्ञात ओवी – ज्ञानेश्वरीच्या प्रथम अध्यायातील पहिली ओवी होय.

ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।१।। या ओवीमध्ये, हे, 'आद्य स्वसंवेद्य आत्मरूपा' अशी हाक अर्थात असे आवाहन, विश्वाच्या मूळ कारणाला केले आहे.

कारणाशिवाय कार्य नाही! कार्य हा कारणाचा आविष्कार असतो. म्हणजेच, आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाचा आविष्कार म्हणजे हे मानवाला दृश्य विश्व होय.

याचाच अर्थ हा विश्वात्मक देव म्हणजे, स्वसंवेद्य आत्मरूप होय. हे विश्व त्या स्वसंवेद्य आत्मरूपाचेच 'स्वरूप' आहे.

माऊली ज्ञानेश्वर महाराज, हे श्रुतिवाङ्मयाचे सार स्वरूप, अर्थात वेदोपनिषदांचे साररूप अशा श्रीमद् भगवद्गीतेवर प्रवचन करीत आहेत. याचाच अर्थ आरंभबिंदूपासूनच्या ज्ञानपरंपरेने, मानवाच्या ठायी जे ज्ञान प्रकाशले आहे; त्या ज्ञानाचा उल्लेख, 'विश्वात्मक देव' असा करतात. म्हणजेच त्या 'स्वसंवेद्य आत्मरूप' देवाच्या विश्वात्मक आविष्काराचा माऊली उल्लेख करतात. 'स्वसंवेद्य आत्मरूप' असा हा आद्य देवच विश्वात्मक रूपात आविष्कृत झाला.

हा देव कुठे विश्वाच्या पलिकडे नाही. तो विश्वात्मक आहे; म्हणजेच तो विश्वाच्या ठायीच आहे. विश्वाच्या, चराचर, दृश्यअदृश्य, अशा, माणसाला अनुभूत होणाऱ्या, प्रत्येक अस्तित्वात तो ठायीच आहे. कारण तो विश्वात्मक आहे.

या विश्वात मानव हे एक आविष्कार रूप आहे. म्हणजेच मानव या अस्तित्वाच्या ठायीही ते 'आद्य स्वसंवेद्य आत्मरूप' आहे. माऊली ज्ञानेश्वर महाराज माणसांच्या समोर, माणसांसाठी, माणसात ठायीच असलेल्या आत्मरूपाला आवाहन करीत आहेत. म्हणजे हा विश्वात्मक देव प्रत्येक माणसाच्या ठायीच आहे. तो माऊली ज्ञानेश्वर महाराजांच्या

ठायीयी आहे, त्यांचे सद्गुरू श्री संत निवृत्ति महाराजांच्या ठायीही आहे, व्याख्यान लिहून घेणाऱ्या श्री सत्चिदानंद बाबांच्या ठायीही आहे. दृश्यअदृश्य श्रोत्यांच्याही ठायी आहे.

माऊली ज्ञानेश्वर महाराज विश्वात्मक देवाला वाग्यज्ञाने संतुष्ट होण्यासाठी विनवितात; ते स्वतःसह सर्वांठायी असलेल्या विश्वात्मक देवाला विनवितात. याचा स्पष्ट अर्थ, माऊली ज्ञानेश्वर महाराज, आत्म संवाद व लोकसंवाद साधतात. तो साधतांना समत्व योगाने, वाग्यज्ञाची सांगता करीत आहेत.

वरवर पाहाता, विश्वात्मक देव आणि माऊली ज्ञानेश्वर महाराज आणि श्रोतृवृंद ही वेगवेगळी अस्तित्वे आहेत; असे अनुभवता येते. त्याचवेळी ही वेगळी अस्तित्वेच नाहीत असेही विश्वात्मकतेने अनुभवता येते. हाच तर अद्वैत योग होय.

हा अद्वैत योग माणसाला साधता येतो. समग्र ऋषी मुनी, संत, सिद्ध परंपरेने हे सिद्ध केले आहे. ते नेमके कशामुळे? हेच तर, विश्वाच्या पसाऱ्यातील एक असलेल्या, माणूस या घटकाचे वेगळे; तरी समावेशक असणे आहे. प्राणीमात्रांच्या ठायी असलेली मन आणि वाणी ही वैशिष्ट्ये; मानवाच्या ठायी सर्वाधिक विकसित आहेत. याचा अनुभव, माणूस घेतो आहे. या वैशिष्ट्यपूर्ण विकसित अवस्थेमुळेच; माणसाचे मन, आत्मरूपाचा, 'स्वरूप' अवस्थेत अनुभव घेऊ शकते. 'मनोस्वरूप विचार' या मी लिहिलेल्या पुस्तकात; याच विचाराचा विस्तार केला आहे. माणसाच्या वाणीला, माणसाने, मनोस्वरूप अवस्थेमुळे, 'स्वरूप' अवस्थेतील प्रतिके योजिली. वैखरी, मध्यमा, पश्यंती, परा वाणी स्वरूपांचा आविष्कार केला. त्या वाणी स्वरूपातील, पहिला स्वरूपाकार ॐ हा होय.

'ॐ' हा त्या स्वसंवेद्य आत्मरूपाचा, मनोस्वरूपाने घडविलेला आविष्कार असल्याने; 'ॐ' हा स्वरूप आविष्कार वाग्विश्वात्मकतेने, वेद प्रतिपादन करणारा ठरला. म्हणजे निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक सर्वव्यापक, अशा आद्य, स्वसंवेद्य आत्मरूपाचा, स्वरूपाविष्कार वाणी स्वरूपात झाला. एक प्रकारे ब्रह्मदेवाने सृष्टी किंवा विश्व निर्माण केले; तसे मानवी मनोस्वरूपाने वाणीविश्व, अक्षररूपांतून अक्षरस्वरूप केले. ह्या मानवाच्या मनोस्वरूपाच्या चिद्विलासामुळेच तर, माऊली ज्ञानेश्वर महाराजांचा हा वाग्यज्ञ सिद्ध झाला आहे.

याकरिताच माऊली ज्ञानेश्वर महाराज 'आद्य स्वसंवेद्य आत्मरूप' या विश्वात्मक देवाला, जसे नमनपूर्वक आवाहन करतात; तसेच 'आद्य स्वसंवेद्य ॐकार स्वरूपाला' म्हणजे वेदप्रतिपादन, अर्थात ज्ञान वाणी आविष्कारातून प्रकाशणाऱ्या, आद्य स्वरूपालाही आवाहन करतात. याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. दृष्टादृष्ट अशा सर्व अस्तित्वांतील आत्मरूपाशी अर्थात विश्वात्मक देवाशी, वाणीस्वरूपयोगाने, आत्मसंवाद करतात. आणि प्रत्येकाच्या ठायीच्या मनोस्वरूपातील, 'आद्य स्वसंवेद्य आत्मरूप' अशा विश्वात्मक देवाला, प्रसन्न होऊन, प्रसाद दान देण्यासाठी, याचना करतात. म्हणजे हा संवाद द्वैताद्वैत स्वरूपातील संवाद आहे. हे लक्षात घेऊन; 'पसायदान' ही प्रार्थना, प्रत्येकाने आत्मपरीक्षणपूर्वक जाणून घेतली पाहिजे. स्वतःमधील विश्वात्मक देवत्व सिद्ध करण्याची; योग साधना करावी; असे माऊली ज्ञानेश्वर महाराजांचे आवाहन आहे.

विश्वात्मक देवाकडे, माऊली ज्ञानेश्वर महाराज 'पसायदान' मागतात. ते कोणते? याचे उत्तर, 'हे' 'पसायदान' त्यांना हवे आहे. त्या 'हे' मधील पूर्वपक्ष म्हणजे, प्रत्येक माणसाच्या ठायी 'विश्वात्मक देव संतुष्ट होवो' अर्थात 'येणे वाग्यज्ञे तोषावे' असे; ते प्रत्येकाच्या ठायीच्या मनोस्वरूप अशा, स्वसंवेद्य आत्मरूपाला सांगत आहेत. ठायीचे स्वसंवेद्य आत्मरूप मनोस्वरूपाने प्रकटले; की 'हे'चा उत्तरपक्ष म्हणून, हवा असलेला प्रसाद आपोआपच मिळेल. जसं संत श्री तुकाराम महाराज म्हणतात, 'मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचे कारण ।।' उत्तरपक्ष म्हणून हवा असलेला प्रसाद, माऊली ज्ञानेश्वर महाराज, पुन्हा दोन पातळीवर अपेक्षितात. –

**जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ।**
**भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।**१७९४ ज्ञा.।।
**दुरिताचें तिमिर जावो । विश्वस्वधर्मसूर्ये पाहो ।**
**जो जे वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।**१७९५ ज्ञा.।।

माऊली ज्ञानेश्वर महाराज असे प्रसाद दान मागतात की– ''हे'' – ''जे'' खळांची व्यंकटी सांडो अर्थात खलवृत्तीतील, खलत्व अर्थात व्यंकटी म्हणजे कुटीलपणा सांडो. अर्थात नाहीसा होवो. प्राणिमात्रांच्या ठायी वासनादेहवृत्तीमुळे स्वार्थपरता आलेली असते. वास्तविक ही स्वार्थपरता केवळ अज्ञानवश असते. कारण वासनादेहच अशाश्वत, विनाशी असतो; तर जिवंतपण अर्थात प्राणिमात्रांच्या ठायीचे स्वसंवेद्य आत्मरूप, असे मनोस्वरूप शाश्वत असते. मनोस्वरूपाच्या ठिकाणी, वासनादेहाच्या वासनालिप्ततेमुळे खलवृत्ती उत्पन्न झालेली असते. ती खलवृत्ती आत्मरूप अशा मनोस्वरूपाचे ज्ञान झाले की; नाहीशी होईल. मन शुद्ध, निर्मळ, निर्लेप, सत्य, प्रेम, करुणा यांनी, म्हणजे स्वसंवेद्य आत्मरूप स्वरूपात प्रकटेल.

माऊली ज्ञानेश्वर महाराज सर्वसामान्य माणसांना, प्रवचनाद्वारे ज्ञान प्रबोधित करीत आहे. म्हणूनच ते स्वसंवेद्य आत्मरूप स्वरूपात, मनोस्वरूप प्रकट होवो; असे तत्त्वज्ञानात्मक भाषण करण्याऐवजी; सर्वांना ठायीच्या अनुभवाने सहज समजेल, असे मागणे मांडतात.

खळांची व्यंकटी अर्थात दुष्टवृत्तीतील दुष्टावा नाहीसा होवो, असे म्हणतात. हा प्रसाद कशासाठी हवा आहे; हे सांगण्याची जबाबदारी निभावतांना, ते म्हणतात की; खळांची सत्कर्मी रती वाढो, खलवृत्तीमधील खलत्व अर्थात कुटीलत्व नाहिसे झाल्यावर, प्राण्याकडून सत्कर्म घडावे, असे माऊलींनी अपेक्षिले. सत्कर्म म्हणजे सत्यनिष्ठ कर्म अर्थात ज्ञानवान कर्म होय. ज्ञानवान कर्म म्हणजे; आद्य स्वसंवेद्य आत्मरूप, हे देवाचे मुळातील स्वरूप, विश्वात्मकतेने मनोस्वरूपाच्या ठायी प्रकटले; की जिवंतपणाची संवेदना, समत्व दृष्टीने भरेल अर्थात अद्वैत दृष्टी प्राप्त होईल.

अद्वैत दृष्टी किंवा वृत्ती प्रकटली की कुटीलतेचा, खलत्वाचा प्रश्नच राहणार नाही. सत्य, प्रेम, करुणा प्रकटेल. माऊलींना ही अद्वैत वृत्ती तात्कालिक नको आहे; तर तो स्वभाव होवो, असे त्यांना वाटते. याकरिता ते जोडून मागणे मागतात, 'रती वाढो'. सत्कर्माने निखळ आनंद मिळतोच परंतु त्या सत्कर्माच्या ठायीच आवड वाढली; तर सत्कर्म स्वभावतः घडेल. आवड ही वासनादेहाच्या ठिकाणी निर्माण होऊन; मनात आविष्कृत होते. म्हणूनच माऊली ज्ञानेश्वर खलत्व सांडतांनाच, वासनादेह आणि आत्मरूप यांचे, रतीस्वरूप प्रकटावे, असे मागणे माऊली मागत आहेत.

सत्कर्म रतीमुळे परिणाम कोणता व्हावा; हेही माऊली स्पष्ट करतात. भूतें परस्पर जीवाचे मैत्र व्हावेत; अशी माऊलींची अपेक्षा आहे. हा मैत्रभाव केवळ स्नेहापुरता नसावा. तो जीवाचा असावा.

सामान्य व्यवहारात जीव म्हणजे जीवात्मा होय. म्हणजे माऊली पुन्हा आत्मस्वरूपाकडे लक्ष वेधतात. सर्वांठायी तेच आद्य स्वसंवेद्य आत्मरूप प्रकटले आहे; याचा अनुभव आला की; जीवा जीवात अद्वैत भाव प्रकटेल हे माऊलींना अपेक्षित आहे.

आपण सामान्य 'जीवाभावाचे मित्र' असा वाक्प्रचार वापरतो. त्यातील अर्थछटा अद्वैत भावाचीच असते. समस्त जीवमात्र परस्परांशी अद्वैत भावाने व्यवहार करोत; असे माऊलींचे म्हणणे आहे. म्हणजे खलत्वच नाहिसे झाले तरी द्वित्त नाहिसे होईल. संघर्षाविहीन समूहमन निर्माण होईल. सर्व भूतमात्रांचा व्यवहार प्रेम आणि करुणा या संवेदनांनी भारून राहील. 'भूत' असा शब्द प्राणीमात्र या अर्थाने आल्यासारखा वाटला; तरी त्यात प्राणीमात्र आणि वनस्पतिमात्र अपेक्षित आहेत. म्हणूनच माऊली या ओवीत केवळ 'भूत' असा शब्द वापरतात; तर पुढच्या ओवीत भौतिकात कर्मशील वाटणारे सजीव, म्हणजे प्राणिमात्र

असा शब्द वापरतात.

खलत्व नाहिसे झाले; की मन शुद्ध होऊन, सात्त्विक भावाने, भूतमात्रांविषयी, करुणापूर्ण मैत्रभाव निर्माण व्हावा हे खरे; त्याचबरोबर माऊली ज्ञानेश्वर महाराज सर्वांठायी अद्वैत स्वरूप असलेल्या, विश्वात्मक देवाला प्राणिमात्रांच्या जीवनातील दुरित नाहिसे होण्यासाठी प्रसाददान मागतात. दुरितांच्या ठायी हे दुरित कोणते आहे? प्राणिमात्रांना त्रिताप भोगावे लागतात, म्हणजेच प्राणिमात्र त्रितापांनी त्रस्त असे दुरित मागत असतात. या त्रितापांच्या जाणिवेमुळे प्राणिमात्र ठायीचे मनोस्वरूप अर्थात स्वसंवेद्य आत्मरूप विसतात. त्यांच्या ठायी त्रितापांच्या भोगामुळे; स्वरूप विस्मरणाचा तिमिर अर्थात अंधार दाटतो. प्राणिमात्र, या अंधारवशतेने, स्वतःचे आणि परस्परांचे अस्तित्व खलत्वाने, दुःखाने, संघर्षाने आणि नश्वरतेच्या निराशेने ग्रासले आहे असे वाटते. यातून प्राण्यांच्या जीवनव्यवहारातील, सत्य, प्रेम, करुणा या आत्मरूपांच्या मूळ संवेदना आणि प्रेरणा बाधित होतात.

जीवन भ्रामक, अंधारमय, निराशापूर्ण आहे असे वाटू लागते. प्रत्येकालाच आपण अपूर्ण आहोत असे वाटू लागते. आपल्याला जे इच्छित हवे आहे ते या अंधःकारमय जगतात शक्य नाही असे वाटू लागते. दैववाद, निष्क्रीयता, अविवेक, वैषम्य, नेणीव, यांचे प्राबल्य माजते. असे दुरित नाहिसे व्हावे यासाठी आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाकडे अर्थात विश्वात्मक देवाकडे; हे दुरित नाहिसे व्हावे अशी प्रार्थना माऊली करतात.

हे दुरित नाहिसे करण्यासाठीचा उपायही माऊली सुचवितात. खरे तर, विश्वात्मक देवाला उपाय सुचवून याचना करण्याचे माऊलींना कारणच काय? याचे स्पष्ट कारण, प्रत्येक प्राण्याचे अस्तित्व मुळी मुळात अद्वैत असते. म्हणजे प्रत्येक अस्तित्व हे ठायीच स्वसंवेद्य आत्मरूप असे स्वरूप असते. म्हणजे विश्वात्मक परमेश्वर मनोस्वरूप स्वरूपात, प्रत्येक प्राण्याच्या ठायीच असतो. तोच तर त्याचा स्वधर्म आहे.



ठायीच विश्वात्मक देव अर्थात आद्य स्वसंवेद्य आत्मरूप असे केवल, निज, स्वसंवित्ती, स्वरूप असल्याने; एक प्रकारे माऊली ठायीच स्वधर्मसूर्य प्रकटावा म्हणजे आद्य स्वसंवेद्य, सच्चिदानंद, परमात्मा असे आत्मरूप प्रकाशावे; असे मागणे मागतात.

असा स्वधर्म प्रकाशला अर्थात ठायीचे विश्वात्मक देवत्व प्रकाशले; की वांच्छेचा विवेक ठायीच प्रकटेल. व्यवहारातील तात्कालिक सुखासंबंधीची वासना अर्थात इच्छा आणि आसक्ती, दुरितात्मक असणार नाही. अज्ञानमूलक वांच्छा नाहिशा होतील. त्रितापयुक्त, अज्ञानमूलक, देहाधीन मनाने जगणाऱ्या प्राणिमात्रां मध्ये हवे ते लाभले; तर सुखी होऊ; असे वाटत असते. ऐहिक वांच्छालिप्त, अशी प्राणिमात्रांची अवस्था असते.

त्या अवस्थेमुळे, प्राणिमात्र आद्य स्वसंवेद्य आत्मरूप, अशा त्यांच्या ठायीच्या स्वरूपाला पारखे होतात. म्हणजेच, स्वधर्माला अर्थात स्व स्वभावाला पारखे होऊन; अज्ञानवश वासनाधिनतेने, प्रपंचव्यवहारातील दुरितात्मक खलत्वपूर्ण जीवन; हाच, मानवधर्म म्हणून, दुःखाच्या विळख्यातच जगण्याची धडपड करतात. मग जीवन संघर्षात, स्पर्धात्मकतेने, स्वार्थलोलुपतेने जगतांना 'जो जे वांछील तो ते लाहो' कसे पूर्ण होणार? यासाठी स्वधर्मसूर्य ठायी प्रकटण्याचे मागणे माऊली अगोदर करतात.

हा विश्वात्मक देव, स्वधर्मसूर्य प्रकाशमान करील आणि मग प्रत्येक प्राण्याला तो पाहता येईल. असे घडले की तो विश्वात्मक देव प्रत्येकाची वांच्छा पूर्ण करील किंवा त्या देवाने प्रत्येकाची वांच्छा पूर्ण करावी; अशी माऊली याचना करीत आहेत.

असे वरवर शब्दार्थ पाहाता वाटतेही! विश्वात्मक देव तर ठायीच मनोस्वरूप असतो. त्यामुळे ठायीच विश्वात्मक देव आहे. त्याचा स्वधर्म म्हणजे पूर्ण ज्ञान होय. तो स्वधर्मसूर्य ठायीच प्रकाशला की समत्व प्रकटेल. मग 'जो जे वांछील' अशी स्थितीच राहणार नाही. प्राणिमात्र

परस्परांत सत्य, प्रेम, करुणा यांचा अनुभव घेत मैत्रभावाने ज्ञानात्मक वर्तन करतील. 'आपली आपण करा सोडवण', – देव तर तूच मग तुझी वांच्छा तूच पुरविणार. तूच विश्वात्मक. त्यामुळे व्यावहारिक द्वित्तच राहणार नाही. असे अद्वैत अर्थात स्वधर्मसूर्य सर्वांठायी प्रकट होवो; असे माऊली मनोस्वरूपाने, मनोस्वरूपालाच प्रसाददान मागतात.

खलत्व आणि दुरित नाहिसे झाले की; प्राणिमात्रांचे जीवन मंगलमय होईल; याची माऊलींना खात्री आहे. ज्ञान प्रकटले की अज्ञान कसे राहणार? सूर्य प्रकाशला की अंधार कसा राहील? हे वास्तव माऊली ज्ञानेश्वर महाराजांना माहीत आहे. म्हणूनच मुळातच विश्वाचे आर्त मनी प्रकाशलेले माऊली; खलत्व आणि दुरितत्व यांचा नाश होवो; असे पसायदान मागतात. आणि मग घडणाऱ्या सच्चिदानंदस्वरूप परिवर्तनाचे चित्र प्रकाशतात –

**वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।**
**अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।**।१७९६ ज्ञा.अ. १८।।
**चलां कल्पतरूंचे आरव । चेतनाचिंतामणीचें गाव ।**
**बोलते जे अर्णव । पीयूषांचे ।**।१७९७ ज्ञा.अ. १८।।
**चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।**
**ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।**।१७९८ ज्ञा.अ.१८।।

माऊली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, विश्वात्मक देव म्हणजे ठायीचेच आत्मरूप, असे मनोस्वरूप होय. ते सच्चिदानंदस्वरूप आहे. सत्य, प्रेम, करुणा हा त्याचा स्वभावधर्म आहे. हे स्वधर्मसूर्य प्रकटताच स्वसंवेद्यतेने जाणवते. तसे झाले की; प्राणिमात्रांच्या वास्तव्याच्या ठिकाणी, म्हणजे भूतलावर, गावागावात, वस्तीवस्तीत, नगरानगरात, अर्थात विश्वात, सर्वप्रकारे मांगल्याचा वर्षाव करणाऱ्या; आस्तिक अशा ईश्वरनिष्ठांचे समूह; या भूमंडळाच्या ठिकाणी; परस्पर, सतत, अर्थात अनवरत



संवादीपणे वागतील, अर्थात भूतमात्रांना सामरस्याने भेटतील तसे घडो.

विश्वात्मक देवस्वरूपाने, ठायीच, प्रकाशमान झालेले, प्राणिमात्र हे स्वर्गातील कल्पवृक्षांप्रमाणे, 'जो जे वांछील तो ते लाहो'; अशा स्वभावाचे प्राणिमात्र समूह, अर्थात मानवमात्रांचे समूह, चालत्याबोलत्या अर्थात चलांस्वरूपातील; म्हणजेच चैतन्यशाली अशा कल्पवृक्षांच्या 'आरवां'प्रमाणे अर्थात बागांप्रमाणे व्यवहार करतील. अर्थात अनुभूत होतील. तसे होवो.

असे अनुभूत होतांना; जणू चैतन्यपूर्ण अशा चिंतामणींचे, अर्थात रसरसत्या स्वयंप्रकाशी, चिंतामणी नावाच्या रत्नांचेच, हे समूह आहेत; अर्थात गावगाव, नगरनगर, अवघे विश्व आहे किंवा जिवंत अशा चालत्याबोलत्या, पीयुषाचे, अर्थात अमृताचे समुद्र आहेत; असे ते, प्राणिमात्रांचे अर्थात मानवमात्रांचे समूह जाणवतील. तसे होवो.

माऊली ज्ञानेश्वर महाराज, संघमनाने जगणाऱ्या, समूहशील अथवा समाजशील अशा, मानवप्राण्यांना, स्वधर्मजागरणाचे आवाहन करीत आहेत. म्हणजे आत्मा आणि परमात्मा यांच्या स्वरूपसिद्धीचे दर्शन; व्यक्ती आणि समाज, या दोही स्तरावर, घडणे माऊली ज्ञानेश्वरांना अपेक्षित आहे.

मानवी समूहाने, विश्वाच्या ठिकाणी मानवकेंद्रित असे, व्यक्ती, कुटुंब, समाज, गाव, पंचक्रोशी, राज्य, जग, विश्व असे व्यवस्थापन करून; मानवकेंद्रित संस्कृति-सारणी मांडली आहे. व्यक्ती-व्यक्तींच्या परस्पर संबंधातून कुटुंबापासून वैश्विकतेपर्यंत, हे व्यवस्थापन आहे. हे व्यवस्थापन सर्व कल्याणात्मक विचाराने प्रकाशले तर; विश्वात कोणी व्यक्ती किंवा समुदाय, अज्ञानमूलक दुःखसागरात, गटांगळ्या खात राहणार नाही.

आद्य स्वसंवेद्य आत्मरूप, हेच विश्वात्मक देव आहे. विश्वात्मक म्हणजे चराचराच्या ठायी स्वरूपस्थितीने आहे. ते सच्चिदानंदरूप आहे. म्हणजे त्याचा स्वभावधर्म अर्थात स्वधर्म सच्चिदानंदरूप असणे असा

आहे. हा स्वधर्मसूर्य प्रत्येकाचे ठायी प्रकटवून; सर्वकल्याणात्मक विचाराने, कर्मतत्पर होण्यासाठी; योगेश्वर श्रीकृष्णांनी पार्थाच्या निमित्ताने या स्वरूपसंबंधाचा अर्थात पूर्ण अद्वैताचा प्रबोध केला. भगवद्‌गीतेतील असा स्वधर्मसूर्य, प्रत्येकाचे ठायी प्रकाशण्यासाठीच माऊलींनी वाग्यज्ञ मांडला, त्या स्वधर्मसूर्य प्रकाशण्यासाठीच विश्वात्मक देवाकडे म्हणजे माणसाच्या मनोस्वरूप आत्मरूपाकडे पसायदान मागितले.

जीवात्मा रूपातील मानवाच्या ठायी असा स्वधर्मसूर्य प्रकाशला की; अवघा मानवच नव्हे, तर अवघे विश्व अमृतसागर होईल; याची जाणीव माऊली ज्ञानेश्वरांना आहे. स्वधर्मसूर्य प्रकाशाचाच, अखिल जीवात्मा रूपातील मानवाचे, जीवन सच्चिदानंदरूप होईल, याची खात्री माऊली देतात. सर्वमांगल्याचा वर्षाव, ईश्वरनिष्ठाचे परस्पर प्रेममय सम ुदाय, चालत्याबोलत्या कल्पतरूंच्या बागा, अमृताचे सागर, चैतन्यपूर्ण चिंतामणींचे गाव अशा रम्य कल्पनाविलासात्मक वाटणाऱ्या चित्रांची मालिका उभी करून; सच्चिदानंदस्वरूपता ठायीच अनुभवता येईल, असे आत्मविश्वासाने माऊली ज्ञानेश्वर महाराज सांगतात. स्वधर्मसूर्य, अर्थात विश्वात्मक देव, ठायीच प्रकाशला की; निष्कलंक चंद्रबिंबाप्रमाणे, त्रितापहीन संतत्त्वाला पोचलेले अथवा सज्जन झालेले, असे सर्व, अर्थात प्राणिमात्र अर्थात मनुष्यमात्र; सर्वकाळ सर्वांशी परस्पर समरसतेने, सामंजस्याने, परस्परांना आनंद देणारे, म्हणजेच परस्परांचे सोयरे अर्थात परस्परांना स्वरूपसिद्धीने जाणणारे होतील. तसे होवो.

पृथ्वीतलावर माणसांच्या सर्वकल्याणात्मक अशा पवित्र सम ाजजीवनाचे चित्र माऊली ज्ञानेश्वर उभे करतात. वरवर पाहाता माऊली ज्ञानेश्वर महाराज, समोर असलेल्या कोणा मूर्तीला; कदाचित शिवांकडे; विश्वात्मक देव म्हणून; आवाहनपूर्वक प्रार्थनापूर्वक पसायदान मागत आहेत असे वाटते. हे पसायदान म्हणजे जणू, वैश्विक मांगल्यासाठी, वैश्विक शांततेसाठीची प्रार्थना माऊली ज्ञानेश्वर करीत आहेत असे वाटते. तथापि देव आणि भक्त असे द्वैत येथे नाहीच; हे लक्षात घेतले पाहिजे. प्रत्येकाच्या ठायीच ते स्वरूप असे, आद्य, केवल, निज, स्वसंवेत्ती स्वरूप, आत्मरूप आहे. ते मनोस्वरूपाने प्रकट झाले की; माऊली ज्ञानेश्वरांना अपेक्षित विश्वात्मक सच्चिदानंदस्वरूप जीवन अनुभवता येईल याची ग्वाही माऊली देत आहेत.

सर्व मानवमात्रांना निखळ सुख हवे असते. ते वस्तुतः ठायीच असते. वासनादेहात, ठायीच्या, या निखळ सुखाच्या ठेव्याचा विसर पडतो आणि जिवंतपण, हीच एक प्रापंचिक यातायात होऊन बसते. या बद्धतेतून मुक्त व्हावे आणि सुख अनुभूत व्हावे. जीवनात शांती असावी ही एकच वांच्छा प्रत्येकाच्या ठायी असते. मनोस्वरूपाने स्वधर्मसूर्य प्रकाशला की; आपसूकच खलत्व, दुरितत्त्वरूपी अज्ञान अंधःकार नाहिसा होऊन; जीवन सच्चिदानंदस्वरूप घडेल असा निर्वाळा माऊली देत आहेत.

खलत्व आणि दुरितत्व नाहिसे करावे; असे प्रसाद दान माऊली ज्ञानेश्वर महाराज मागतात. त्याचवेळी खलत्व आणि दुरितत्व नाहिसे करून; मनुष्यमात्राला कोणत्या प्रकारची मनोवस्था प्राप्त करून द्यावी; याविषयीचे स्पष्ट निवेदन करतात. विश्वात्मक देवाकडे अर्थात आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाकडे म्हणजेच आत्मरूप स्वरूप अशा मनोस्वरूपाकडे माऊली प्रसाद मागतात–

**किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकी । भजिजो आदिपुरुखी । अखंडित ।।**१७९९ ज्ञा.अ. १८।।

किंबहुना, या निवेदन स्पष्टीकरणार्थ वापरलेल्या शब्दाने; खलत्व आणि दुरितत्व, हे मनाला व्याप्त करणारे, अर्थात जीवात्म्याला व्यापून त्रस्त तथा दुःखी करणारे विकारव्याधी आहेत. त्या नाहिशी कराव्या असे स्पष्ट करतात.

माऊली त्रिविध स्वरूपाचे मागणे मांडतात. त्यातील एक मागणे आहे,

मनुष्यमात्रास आणि पर्यायाने भूतमात्रास, सर्वसुख प्राप्त होवो. सर्वसुख म्हणजे निर्लेप तथा निरपेक्ष सुख होय. म्हणजेच सच्चिदानंदस्वरूप प्राप्त होवो. खलत्व आणि दुरितत्व नाहिसे झाले की; वासनादेहाच्या ठायी आपसुकच, इहलोकीचे अशाश्वत, मर्त्य अर्थात व्यवहारतः भासमान होणारे, सुख आणि दुःख नाहिसे होईल. तसे होवो. जीवात्म्याला आत्मानंदसुखाचा लाभ होवो. असे घडण्यासाठी माऊली ज्ञानेश्वर महाराज, जीवात्म्याच्या अर्थात मनुष्यमात्राच्या अर्थात भूतमात्राच्या, व्यावहारिक जीवनातील, व्यवहाराच्या स्थितीगतीविषयी मागणे मागतात.

ते मागणे 'तिही लोकी पूर्ण होऊन' असावे, असे आहे. सच्चिदानंदस्वरूप स्थिती मनोस्वरूपाला प्राप्त व्हावी म्हणजे व्यवहारकर्म सांडावे असे नाही. स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ अशा तीनही लोकी; अर्थात सत्व, रज आणि तम, अर्थात कर्माच्या ठायी निर्लेप, निरपेक्ष आनंदमयता, कर्माच्या ठायी सर्वकल्याणात्मक उपभोग्यता आणि कर्माच्या ठायी अज्ञानवश स्वार्थांधता; अशा लोकच्या तीनही अवस्थांचे ठायी, जीवात्म्याची मनोस्वरूपता प्रकटावी. या तीनही लोकी ही मनोस्वरूपता पूर्ण स्वरूपाने प्रकटणे म्हणजे पूर्ण पुरुषार्थाने वर्तन घडणे होय.

माऊली ज्ञानेश्वर महाराज पुरुषार्थपूर्णतेची अपेक्षा तीनही लोकाचे ठिकाणी करीत आहेत. याचाच अर्थ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष, या चारही पुरुषार्थाने घडणारे कर्म, हे ज्ञानवान असावे, म्हणजे मनोस्वरूपाने घडावे.

भगवद्गीतेतील, विषादयोग, सांख्ययोग, कर्मयोग, ज्ञानसन्यासयोग, योगगर्भयोग, आत्मसंयमयोग, ज्ञानविज्ञानयोग, ब्रह्माक्षरनिर्देशयोग, राजविद्या राजगुह्ययोग, विभूतियोग, विश्वरूपदर्शनयोग, प्रकृतिपुरुषविवेकयोग, गुणातीतयोग, पुरुषोत्तमयोग, दैवासूरसंपादिभागयोग, श्रद्धादिनिरुपणयोग, या सर्व विचारयोगांचा समन्वय, जीवात्म्याच्या दृष्टीने, भक्तियोगाच्या ठायी होऊन; ज्ञानवान कर्म घडावे, अशी अपेक्षा आहे. 'पूर्ण होऊन तिही लोकी' हे मागणे



यासाठी व्यक्त करतात.

यासाठीच माऊली विश्वात्मक देवाकडे तिसरे मागणे मागतात. ते 'भजिजो आदिपुरुखीं अखंडित' असे आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे. जीवात्म्याने आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाची भक्ती करावी. त्या आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाला अखंडपणे भजावे. जीवात्म्याने निमिशमात्रही आत्मरूपाचा विसर पडू देता कामा नये; अशी अखंड आराधना करावी. अखंड स्मरण करावे. अखंड उपासना करावी अर्थातच जीवात्म्याचे जीवन, हीच आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाची उपासना असावी. ठायीच नित्य सात्त्विकता जागावी.

ते आद्य स्वसंवेद्य आत्मरूप हाच तर विश्वात्मक देव आहे. प्रत्येक भूतम ात्र त्याच्याच स्वरूपाने आविष्कृत झाले आहे. म्हणजेच, जीवात्मा, मुळात आत्मरूपाच्या योगाने अद्वैत स्थितीतच, पृथक आविष्काररूप अनुभवतो आहे. असे आविष्काररूप अनुभवता येणे हे त्या आद्य आत्मरूपाच्या, स्वसंवेद्यता स्वभावाने घडते आहे. याकरिता, जीवात्मा हा कोणी भोग भोगण्यासाठी आलेला पदार्थ नाही; हे माऊली ज्ञानेश्वर महाराज स्पष्ट करतात.

जीवात्म्याचा स्वधर्म आत्मरूप अशा मनोस्वरूपाने वर्तन करणे हा आहे. याकरिता जीवात्माविष्कार हे तर आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाचे ऐश्वर्य आहे. या जीवात्म्याने, या आत्मरूप स्वरूपस्थितीचे जागरण करणे; म्हणजे भक्ती करणे होय! येथे द्वैतातील अद्वैत भाव भक्तियोगाने सिद्धीस जाईल; असे माऊली प्रतिपादित करीत आहेत. द्वैतातील, अनुभूत होणारा अद्वैतभाव, म्हणजेच ज्ञान होय! याचा अर्थ भक्ती-ज्ञान-वैराग्य ही अखंड अशी साधना अर्थात प्रक्रिया आहे. याकरिताच जीवात्म्याने भक्तीची साधना करावी.

विश्वात्मक देव म्हणजेच सर्वांभूती परमेश्वरत्व अनुभूत करणारे मनोस्वरूप प्रकटणे होय. म्हणूनच विश्वात्मक देवाचे प्रतीक व्यवहारतः स्वीकारून; सर्व देवदेवतांचे भक्तिभावाने जागरण करणे म्हणजे; त्याच

आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाचे, जीवात्म्याच्या ठायी मनोस्वरूप प्रकटणे होय. अशा ज्ञानात्मकतेने भूतमात्रांच्या ठायीचे देवत्व अनुभवण्याची साधना भक्तियोगात गर्भरूपाने वास करते. याकरिताच, प्रचलित स्थितीगतीतील, अनेक देवदेवतांना भजणे हे त्या विश्वात्मक देवाला भजणेच असते. मात्र अट एक आहे. हे भजणे तीही लोकी पूर्णत्व अनुभवत; म्हणजेच ज्ञानात्मकतेने घडले पाहिजे. भक्ती आणि ज्ञान यात कोणताही अंतरविरोध नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

माऊली ज्ञानेश्वर महाराज आणखी म्हणतात, की या वाग्‌यज्ञाच्या निमित्ताने अर्थात या ज्ञानप्रबोधक, व्याख्यानात्म, संवादाने प्रसन्न झालेल्या; मनोस्वरूप अशा विश्वात्मक देवाने, पृथ्वीतलावरील या लोकांच्या ठिकाणी दृष्टादृष्ट असे समस्त मनुष्यमात्र या ग्रंथाच्या योगाने, अर्थात यातील विचारांच्या, समन्वयात्मक अनुभूतीने, लोकी म्हणजे व्यवहारतः कर्माच्या ठिकाणी विजयी व्हावा. अर्थात यशस्वी व्हावा. म्हणजेच सकलपुरुषार्थाने सिद्ध व्हावा.

माऊली म्हणतात –

**आणि ग्रंथपजीविये । विशेषी लोकीं इयें ।**
**दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।**१८०० ज्ञा.अ. १८।।

विशेषतः इये लोकी, अर्थात विश्वातील पृथ्वीलोकाच्या ठिकाणी; म्हणजे मानवलोकात, अर्थात मृत्युलोकात; आज दृष्ट असलेले आणि आज अदृष्ट असलेले; अर्थात समोरचे श्रोते आणि येथे नसलेले मानवलोकातील अन्य सर्व; तसेच वर्तमानात मानवलोकी असलेले आणि भविष्यात पुढे मानवी लोकी असणारे, येणारे अथवा प्रकटणारे असे सर्व मानवमात्र विजयी होवोत. या ग्रंथाच्या सहाय्याने जगणारे असे हे सर्व विजयी होवोत. अर्थात या ग्रंथातील सर्वसुख, पूर्णपुरुषार्थ आणि भक्ती या कल्पना विचाराच्या सहाय्याने आत्मसात करून; जे



जगण्याचा, अर्थात जीवनात अवलंब करून जगण्याचा प्रयत्न करतील; ते आपल्या जीवनात विजयी होवोत, अर्थात कृतार्थ होवोत.

माऊली ज्ञानेश्वर महाराजांच्या, या मागणीतील मर्म जाणून घेणे, आवश्यक आहे.

'ग्रंथोपजीविये' असे म्हणतांना माऊलींना श्रीमद्‌भगवद् गीतेवरील हा वाग्‌यज्ञ अर्थात प्रवचन, असे म्हणावयाचे आहे. समग्र परिवर्तनासाठी वाङ्‌मयाचा उपयोग होतो हे माऊलींनी स्पष्ट केले आहे. भगवद्‌गीतेच्या उद्‌घाटनाने, दुष्टप्रवृत्तींचा नाश करून सुकृतांचा विजय संपादण्याचे सामर्थ्य अर्जुनाला प्राप्त झाले. खलत्व आणि दुरितांच्या कचाट्यात सापडलेला समाज, असत्याला प्रतिष्ठित करणारे खलपुरुष, अनाचार, दंभाचार आणि भ्रष्टाचार यांच्या होणाऱ्या सरशीने, भ्रांत झालेला समाज, आणि धर्मकर्ममीमांसेच्या भ्रामक संमोहात अडकलेले धुरिण; यांच्या ठायी भगवद्‌गीतेने समग्र परिवर्तन केले. स्वधर्मसूर्य प्रकाशित करून; अधिष्ठितही केला. हा भूतकाळ लक्षात घेऊन; प्राप्त काळातील, समग्र परिवर्तनासाठी, पुन्हा; संघर्षात्मक महाभारतातील, भगवद्‌गीताप्रसंगच उपयुक्त ठरेल असा विचार करून; माऊलींनी ग्रंथप्रकाशनाने समग्र परिवर्तन घडेल किंवा घडावे यासाठी वाग्‌यज्ञ मांडला.

मतामतांचा गलबला, अंधरूढीपरंपरा, कर्मकांडांना आलेले अतिरेकी महत्त्व, कर्मकांडात्मक धर्मशास्त्र, म्हणून ग्रंथांचा उपयोग करणारे धर्मसत्ताधीश, या कचाट्यात कुटुंबसंस्थेपासून, राजसत्तेपर्यंत; एवढेच नव्हे तर; न्यायसत्तेपर्यंत, स्वार्थांध होऊन; मानवी जीवन कुंठीत करीत होते. आपल्या धर्मकर्माच्या स्वार्थ कुंडात, वेदांतातील विश्वात्मक अद्वैत विचाराचा प्रवाह कुंठीत झाला होता. भगवद्‌गीतेत वेदांत साठविला असल्याने, वेदांताचे मानवमात्रातील प्रत्यक्ष अस्तित्व अनुभूत करविले; तर खलत्व आणि दुरितत्व नाहिसे होईल. या परिवर्तनासाठी, माऊली ज्ञानेश्वर महाराजांनी या ग्रंथाच्या सहाय्याने, मानव जीवन सारणी अवलंबिल्याने, कृतार्थता प्रकटेल अर्थात परिवर्तन होईल अशी ग्वाही

दिली आहे.

'विशेषी लोकी इये' ह्या उल्लेखातून, प्रचलित असलेला मानवलोक आणि भविष्यात प्रचलित होणारा मानवलोक, अपेक्षित आहे. 'म ानवलोक' असे विधान करतांना 'लोक' या पदाने समस्त मानवमात्रांच्या विश्वात्मक कुटुंबाचा विचार माऊली मांडतात. वेदांतातील अद्वैत विचाराचा, विश्वात्मकता हा गाभा आहे. समष्टीच्या एकात्मतेचा विचार त्यात गर्भित आहे. मानव लोकची धारणा कशी आहे; याकडे लक्ष वेधले पाहिजे.

हा 'लोक' संस्थात्मक गुंफणीतून तयार झालेला असतो. कुटुंब, वंश, जात, जमात, समाज, ग्राम, पंचक्रोशी, प्रदेश, देश, विश्व अशी गुंफण असते. या प्रत्येक स्तरावर, एक व्यवस्थापन, मानवी समूहमनातून आकारित झालेले असते. या प्रत्येक स्तरावर धर्मधारणेच्या दृष्टीने - दैवत कल्पना, परस्परांना बांधून ठेवणारी नाते-संबंधांची गुंफण, त्यातील जीवनव्यवहाराविषयी, अर्थात खाणेपिणे, प्रजनन आणि परस्परसंबंध, घरेदारे, शेतीपोती, या सर्व संबंधाने रूढीपरंपरा निर्माण झालेल्या असतात. प्रत्येक स्तरावर धर्मसत्ता, धनसत्ता, राजसत्ता, न्यायसत्ता, नियतीसत्ता आणि निसर्गसत्ता कार्यान्वित असतात. या सर्व प्रकारच्या सत्ता हीदेखील समूहमनाची म्हणजे 'लोक'ची निर्मिती असते.

या सर्व स्तरावर, व्यवहार आणि रंजन यांची सांगड, सौंदर्यदृष्टीने घालून; समूहमनातून उदित झालेल्या कलांचे; या सर्व सत्तांशी आणि भावभावनांशी निगडित प्रचलन असते.

या व्यवहारात मानवमात्रांचा भूतमात्रांशी असलेला संबंध नियोजित केलेला असतो. असा संस्थात्मक गुंफणीतून निष्पन्न 'लोक' हा नव्यानव्या पिढ्यांच्या प्रवाहाने सतत, स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने प्रवाहित असतो. या 'लोक'मध्येच खलत्व आणि दुरितत्व या भावात्मक गोष्टी सत्तासंबंधाने निर्माण होऊन; सर्व स्तरांवर अत्यंतिक स्वार्थपरता निर्माण होऊन; जीवन बंदिस्त, दुःखी, निरुपायी, प्रवाहपतित वाटते.



अशा अवस्थेत सुख, आनंद शोधण्याचा प्रयत्न करतांना, भ्रामकतेने तात्कालिक किंवा अशाश्वत अशा सुख आणि आनंद प्रतीतीला महत्त्व प्राप्त होते. पापपुण्याच्या विपरित कल्पना, देवाच्या दिव्यत्वाविषयीच्या विकृत कल्पना, अंधविश्वासात्मक रूढींना जन्म देऊन; वावरत असतात. अशा मानवलोकात ग्रंथाच्या उपयोजनाने परिवर्तन घडावे असे माऊली ज्ञानेश्वरांना वाटते. या लोकात 'दृष्टादृष्ट विजयी व्हावेत' अशी माऊलींची मागणी आहे.

'विशेषी लोकीं इयें' 'पूर्ण होऊनि तिही लोकी' 'सर्वसुखी' होऊन; आद्य स्वसंवेद्य आत्मरूपास भजावे अर्थात 'आदिपुरुखी' भजावे अर्थात एकरूप व्हावे; अशी अपेक्षा माऊली ज्ञानेश्वरांनी केली आहे. ही अपेक्षा पूर्ण व्हावी यासाठीच तर, वाग्यज्ञ केला. 'विशेषी लोकी इये' दृष्ट अदृष्ट विजयी अर्थात पुरुषार्थपूर्ण व्हावेत यासाठी हा वाग्यज्ञ स्वरूप ग्रंथ, उपयुक्त ठरावा, असे माऊलींनी अपेक्षिले आहे. या दोन्ही ओव्यांच्या उल्लेखामधून माऊली ज्ञानेश्वरांची वैश्विक एकात्म मानवी राष्ट्राची कल्पना प्रकट झाली आहे.

यातील 'दृष्ट' 'लोक' म्हणजे प्रत्यक्ष संबंधित असा जवळचा किंवा भोवतालचा 'लोक' अर्थात मानवीसमूह. कुटुंबापासून प्रदेशापर्यंत व शेवटी विश्वापर्यंत ही कल्पना विस्तारित होते. मात्र मानवी व्यवस्थापनाच्या दृष्टीने भाषा आणि संस्कृती यांचा विचार केला तर भारत अथवा हिंदुस्थान हा दृष्ट लोक ठरतो. तो विजयी व्हावाच परंतु त्याबरोबरच अदृष्ट असा जगभरातील मानवमात्र विजयी व्हावा. ही कल्पना; भारतीय सांस्कृतिक राष्ट्र विचारातील, वैश्विक भूमिका स्पष्ट करते.

जसा दृष्ट म्हणजे वर्तमानातील आणि अदृष्ट म्हणजे पुढील काळातील असा चिरंतन शाश्वताचा विचार येतो; तसाच विश्वात्मक राष्ट्राचा अर्थात विश्वबंधुत्वाचा विचार प्रकट होतो. यासाठीच 'विश्वात्मक देव' या संवेद्यतेस माऊली प्रार्थना करतात. सनातन हिंदू अर्थात वैदिक संस्कृतीची वेदांतावर आधारित मानवी जीवनशैली ही व्यष्टीपासून

समष्टीपर्यंतच्या एकात्मिक स्वरूपविचाराने प्रवाहित आहे. प्रत्येक मानव स्वसंवेद्य आत्मरूपाच्या, मनोस्वरूपाने कर्मवान झाला; तरच सनातन भारतीय राष्ट्राचे, विश्वात्मक राष्ट्रस्वरूप प्रकटेल. असे माऊलींना वाटते. श्रीमद्भगवद्गीतेतील भूतमात्रांसंबंधीचा आघवा अर्थात अवघा विचार माऊली पुन्हा पुन्हा स्पष्ट करतात.

माऊलींनी विश्वात्मक देवाकडे विश्वविजयासाठी केलेली ही प्रार्थना म्हणजे; मनुष्यमात्राच्या ठायी; आद्य स्वसंवेद्य आत्मरूप अशा परमेश्वराच्या अर्थात विश्वात्मक देवाच्या, मनोस्वरूप जागरणासाठीची प्रार्थना आहे. ही प्रार्थना विश्वात्मक देव स्वरूप असे सद्गुरू अर्थात 'विश्वेशराव', विश्वराष्ट्रसम्राट स्वीकारतात,

**येथ म्हणे श्री विश्वेश्वरावो । हा होईल दान पसावों । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।**१८०१ ज्ञा.अ. १८।।

आणि संत सद्गुरू निवृत्तिनाथांनी अपेक्षित प्रसाददान दिले आहे; असे घोषित करतात अर्थात 'तथास्तु!' असा आशीर्वाद देतात. या आशिर्वादाने अर्थात वराने स्वरूपसिद्ध माऊली ज्ञानदेव 'सुखी झाला' अर्थात सच्चिदानंद स्वरूप झाला असे; वाग्यज्ञाचे लेखन करून; ग्रंथरूप देणारे, सच्चिदानंदबाबा घोषित करतात. या दृष्टीने पसायदान ही 'लोकनिष्ठ अध्यात्मवादा'ची संहिता ठरते, तशीच ती विश्व सच्चिदानंदस्वरूपाने मनुष्यमात्राला संवेदित होण्यासाठी ही प्रार्थना ठरते. या विश्वात्मक भूमिकेमुळेच 'पसायदान' ही विश्वशांतीसाठीची प्रार्थना म्हणून जगात स्वीकृत झाली आहे.

* * *



# प्राचार्य डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांचा व्यक्ती-परिचय


**नाव** : अनिल नागेश सहस्रबुद्धे
**जन्म** : २४ ऑगस्ट १९४७ (अकोले, अहमदनगर)
**शिक्षण** : टी.डी., बी.एड., एम.ए. (मराठी), पीएच.डी.
**पत्ता** : 'आई', समर्थनगर, श्रीराम चौक, (हॉटेल सागरच्या मागील बाजूस), पाईपलाईन रोड, अहमदनगर. महाराष्ट्र.
दूरध्वनी (०२४१) २४२४१६७, भ्रमणभाष ९८८१५००९४२.
usahasrabuddhe@gmail.com,
Website : www.anilsahasrabuddhe.com


**पीएच.डी.**

'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास'. पीएच.डी.साठी प्रबंध पुणे विद्यापीठ. पीएच.डी. १९७९-८०.

**प्रसिद्ध साहित्य**

**अ) संशोधन / समीक्षा / वैचारिक :**

**लोकसाहित्य** : १) चाळीसगावडांगाणी (खंड १) लोकवाङ्मय- आनंदोत्सव प्रकाशन मंच, ३१ डिसेंबर २०१३. २) चाळीसगावडांगाणी (खंड २) लोकबंधात्मक आकलन आनंदोत्सव प्रकाशन मंच, ३१ डिसेंबर २०१३. ३) लोकसाहित्य विचार : सविता प्रकाशन, औरंगाबाद १९९०. ४) लोकबंध : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९५, द्वितीय आवृत्ती नितीन प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे २०१२. ५) लोकसाहित्य संशोधन पद्धती : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९७, द्वितीय आवृत्ती नितीन प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे २०१२. ६) लोकसाहित्याचा अन्वयार्थ : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००३. ७) लोकसाहित्याच्या अभ्यासातील चकवे आणि उतारे : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २०१०. ८) लोकबंधात्मक चिकित्सा : नितीन प्रकाशन पुणे, प्रकाशक श्री. नितीन गोगटे, २०१२. ९) लोककला, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०२१.१०) लोकसंस्कृती व लोकसाहित्य, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०२१.

**संत साहित्य** : १) 'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९१, द्वितीय आवृत्ती २००५. २) लोकी अलौकिक तुकाराम : प्रकाशक डॉ. लहवितकर प्रोफेसर व प्रमुख श्री तुकाराम अध्यासन, पुणे विद्यापीठ, पुणे २०१२. ३) (सार्थ) 'बालावबोध' : समर्थ स्वामी त्र्यंबकराज महाराज (भावानुवाद) - समर्थ स्वामी त्र्यंबकराज देवस्थान ट्रस्ट, देवळाली प्रवरा, राहुरी, २०१२. ४) '(सार्थ) योगसंग्राम' संत श्री शेख महंमद महाराज (भावानुवाद) : संत श्री शेख महंमद महाराज उत्सव समिती ट्रस्ट श्रीगोंदा, अहमदनगर २०१४. ५) 'संतांचिया संगे' : मोरया प्रकाशन, पुणे/डोंबिवली २०१४. ६) आदिमांचे वर्तमान : चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०१५. ७) श्री संत शेख महाराजकृत अभंगवाणी : श्री संत शेख महंमद महाराज देवस्थान उत्सव प्रतिष्ठान व ग्रामस्थ, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर, फेब्रुवारी/मार्च २०१७.८) संत वाङ्मयाच्या आशयनिष्ठ अभ्यासाची दिशा : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे, २४ ऑगस्ट २०१८. ९) संत वचनांची मात : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे २०२१. १०) संत प्रबोधित मनोस्वरूप विचार : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२१. ११) अमृतगुटिका : आनंदोत्सव, अहमदनगर २०२१. १२) स्वरूपाशी संवाद : पसायदान, आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२. १३) हरिपाठ (हरिपाठाचे मर्मलक्षी विवेचन) : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२. १४) नमामि देवी अमृते : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२.

**साहित्यशास्त्र / समीक्षा** : १) प्रस्तावना : स्वरूप आणि संकल्पना : पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००७. २) समीक्षा : प्रयोजन आणि कार्य : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००८. ३) 'साहित्याची समग्रता' : चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०१७. ४) वाङ्मय संस्कृती : साद-संवाद, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २४ ऑगस्ट २०१९.

**संशोधन / तत्त्वज्ञान / वैचारिक** : १) अन्नासाठी दाही दिशा : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २००२.

२) आदिमांचे वर्तमान : चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१५. ३) लोकनिष्ठ अध्यात्मवाद : पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०१६. ४) 'लोकधर्म' : आनंदोत्सव, नगर २०१६. २१) 'लोकार्थ'- आनंदोत्सव नगर २०१७. ५) शोध पांडुरंगाचा : पद्मगंधा प्रकाशन, पुणे, डिसेंबर २०१९. ६) चिंतन मोती : आनंदोत्सव, नगर २०१८. ७) मनोस्वरूप विचार : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२१. ८) रामदासांचे वैश्विक रामराष्ट्र : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२२. ९) प्रवरा परिक्रमा : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२२.

**चरित्र** : १) संत शेख महंमद महाराज : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे- जुलै २०१८. २) 'कैवल्यगंध' : आनंदोत्सव, नगर २०१६. ३) हनुमान चरित्र : गंधर्ववेद प्रकाशन, पुणे २०२१.

**ब) ललित साहित्य : कादंबरी : अ) सामाजिक** : १) डांगाणी : परिमल प्रकाशन. औरंगाबाद १९८५. २) काळ साद घाली : 'अद्‌भूत कादंबरी' मासिक, संपा. ग. वा. बेहेरे १९८६. ३) वावटळ : राजेंद्र पब्लिकेशन पुणे/ठाणे १९८७. ४) भेद : राजेंद्र पब्लिकेशन पुणे/ठाणे १९८८. ५) मातंगी : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९२.

**ब) नवप्रयोगात्मक** : १) सत्यनारायण थापाडे पाटील : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९३. २) परवेडा : प्रीती प्रकाशन, पुणे २००२. ३) अनंत : विमल पब्लिकेशन प्रा. लि. पुणे, मार्च २०१९.

**क) पौराणिक चरित्रात्मक** : १) 'अगस्त्य' : पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे २८, फेब्रु. २०१०, द्वितीय आवृत्ती २०१७, ('अगस्त्य' कादंबरीचा इंग्रजी अनुवाद व कन्नड अनुवाद ई-बुक). २) 'नारद': पद्मगंधा प्रकाशन, पुणे २०१७.

**ड) अद्‌भूत** : १) क्षयवटाच्या पारंब्या : राहुल प्रकाशन, मुंबई १९९२. २) साक्ष पंचाहत्तरी : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे, २०२२.

**इ) ऐतिहासिक** : १) अहिनकुल : परिमल प्रकाशन, औरंगाबाद १९८६.

**कथासंग्रह** : १) इंडियन फ्रायडूच्या चंद्री आणि इतर कथा : क्रिएटिव्ह कम्युनिकेशन, नगर २००१. २) कारव : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००२. ३) विलक्षण : प्रीती प्रकाशन, पुणे २००३. ४) नारद ब्रेकींग न्यूज : पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे, एप्रिल २०१२.

**नाटक** : १) भरारी आणि भानगडी : नंदा प्रकाशन, मुंबई २००१. २) संभव असंभव : प्रीती प्रकाशन, पुणे २००२. ३) जातक यज्ञ : आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर २०२१.

**एकांकिका** : १) कातळी निखारे : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००३.

**कवितासंग्रह** : १) आव्हान : स्फूर्ती प्रकाशन, नगर १९९४. २) कोऽहम : हेमंत प्रकाशन, नगर २००६. ३) प्रिया : हेमंत प्रकाशन, नगर २००६. ४) श्री अगस्त्य महात्म्य : प्रकाशक सौ. उषा सहस्रबुद्धे, नगर (प्रथमावृत्ती) २००८, (द्वितीय आवृत्ती, प्रकाशक श्री अगस्ती देवस्थान ट्रस्ट अकोले फेब्रुवारी २०१८) (पोथी) ५) मानसतरंग : क्रिएटिव्ह प्रकाशन, डिसेंबर २०११. ६) ऋषी लोपामुद्रा चरित्र : आनंदोत्सव, अहमदनगर, (फेब्रुवारी २०१८) ७) ऋषी अगस्त्य नित्यपाठ-अभंग : आनंदोत्सव, अहमदनगर, (फेब्रुवारी २०१८) ८) श्री अगस्त्यऋषी अभंगावली : आनंदोत्सव, अहमदनगर, (फेब्रुवारी २०१८).९) आरती संग्रह : आनंदोत्सव, अहमदनगर २०२२

**ललित/चिंतनात्मक** : १) जनात आणि मनात : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००२. २) मनात आणि अवकाशात, मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे २००३. ३) स्पंदन शिल्पे : आनंदोत्सव प्रकाशन मंच, नगर, ऑगस्ट २००९. ४) गौरव गाभारा : आनंदोत्सव, अ.नगर २०२१. ५) मनाशप्पत खरं सांगेन : (प्रेसकडे)

**संपादित** :

१) ज्ञानवेध : मोरया प्रकाशन, डोंबिवली/पुणे १९९० (डॉ. मोरजे गौरवग्रंथ). २) तेजाची लेणी : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९९९(स्वातंत्र्यवीर सावरकर, कवी कुसुमाग्रज आणि शाहीर अमरशेख यांच्या राष्ट्रीय जाणिवेच्या निवडक कवितांचा संग्रह. पुणे विद्यापीठाचे एफ.वाय.बी.ए.साठी नेमले गेलेले पाठ्यपुस्तक.) ३) 'अभंगपौर्णिमा' या ग्रंथात समीक्षालेखन सहभाग आणि संपादन साहाय्य, अभंगपौर्णिमा प्रकल्प प्रमुख, आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर. अभंगपौर्णिमा : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे २०११. ४) आनंदमेळा - कविसंमेलन : आनंदोत्सव प्रकाशन मंच, नगर २०१२.